# प्रेसनोट दि. ०६/०९/२०१८

## शरद मोहळ टोळीतील खंडणीचे गुन्ह्यातील सन २०१४ पासुन पाहिजे फरारी आरोपीस दरोडा प्रतिबंधक पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----ooo-----

दि. २६/०३/२०१४ रोजी सायंकाळी ०६.५० सुमारास निखील मेटल्स, स.नं.३८/२, पारी कंपनी जवळ, न-हे, ता. हवेली, पुणे या ठिकाणी फिर्यादी नामे अनिल घेवरचदं संघवी रा. धायरी, पुणे यास आरोपी नामे रामदास उर्फ राम तुकाराम खोपकर, वय-३० वर्षे, रा.मौजे-मुठा, ता-मुळशी, जि-पुणे याने व त्याचे साथिदार यांनी मोटार सायकल वरुन येऊन चाकुसारख्या हत्याराचा धाक दाखवुन फिर्यादीला व फिर्यादीचे कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी देऊन ५०,०००/- रुपयांची खंडणीची मागणी केली म्हणुन त्यांचेविरुध्द दत्तवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं-१३८/२०१४ भादवि कलम ३८५, ३४ प्रमाणे खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर खंडणीचे गुन्ह्यांत पोलीसांना सन २०१४ पासुन हुलकावण्या देत असलेला शरद मोहळ टोळीतील पाहीजे फरारी आरोपी नामे रामदास उर्फ राम तुकाराम खोपकर हा ओम साई गणेश मंडळ, सुतारदरा, कोथरुड, पुणे येथे येत असल्यांची बातमी पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमीदारामार्फत मिळाल्यांने त्या बाबत मा. पोलीस निरीक्षक सो. श्री,राजेंद्र कदम यांना माहिती देवुन वरिष्ठांचे परवानगीने दरोडा प्रतिबंधक पथकाकडील स्टाफसह बातमी प्रमाणे जावुन नमुद पाहिजे फरारी आरोपीस सिताफीने पकडुन जेरबंद केले आहे.

सदर आरोपीविरुध्द यापुर्वी २ खंडणीचे व शरीराविरुध्दचे गुन्हे पौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख. दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र कदम, यांचे मार्गदशनाखाली सहा.पोलीस फौजदार श्री.शंकर पाटील, अजय थोरात, रामदास गोणते, अमोल पवार, विल्सन डिसोझा यांनी केली.